RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक १७] बुधवार, ऑगस्ट २१, २०१३/श्रावण ३०, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**—महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-४ |

दिनांक २० ऑगस्ट २०१३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २१ ऑगस्ट २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१३ चा महा. १. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २ जुलै २०१३ रोजी, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१३ हा प्रख्यापित केला होता ; (२०१३ चा महा. अध्या. १२.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ जुलै २०१३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये,— २०१३ चा महा. १.

(१) खंड (च) वगळण्यात येईल ;

(२) खंड (ठ) मध्ये "पूर्व-प्राथमिक शाळा," हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(१) विद्यमान कलम ३ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ;

(२) "पूर्व-प्राथमिक किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(३) "३० जून" या मजकुराऐवजी "३१ जुलै" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षाकरिता असा अर्ज ८ ऑगस्ट २०१३ पूर्वी करण्यात येईल.";

(५) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(२) शासनाला, पात्रतेबाबत घोषणा करणे, इरादा पत्र व मान्यता पत्र देण्यासह पोट-कलम (१) खाली प्राप्त झालेल्या अर्जांवर प्रक्रिया करण्याच्या कार्यपद्धतीचे तपशील विहित करता येतील.

(३) जर विकास आराखड्यामध्ये, सक्षम प्राधिकरणाने अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड शैक्षणिक प्रयोजनांसाठी राखून ठेवलेला असेल तर, अशा बाबतीत शासनास, नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट शिथिल करता येईल :

परंतु, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता अशी शिथीलता भूतलक्षीप्रभावाने करता येईल.

(४) अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अन्वये आवश्यक असलेली मानके व प्रमाणके यांचे अनुपालन करणाऱ्या शाळांच्या दर्जावाढीच्या प्रस्तावांना लागू असणार नाही. २००९ चा ३५.

(५) कोणत्याही नोंदणीकृत न्यासाने किंवा नोंदणीकृत संस्थेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने पोट-कलम (१) अन्वये नवीन शाळा स्थापन करण्याकरिता अर्ज सादर केला असेल आणि अनुसूची 'क' च्या नोंद (११) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीकृत दस्तऐवजाव्यतिरिक्त सर्व अटींचे अनुपालन केले असेल अशा बाबतीत, जर अशा न्यासाने किंवा संस्थेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने संबंधित यथोचित नोंदणीकृत दस्तऐवज इरादा पत्र देण्यापूर्वी सादर केले असतील तर, शासनास, अर्ज केलेली नवीन शाळा स्थापन करण्यासाठी परवानगी देता येईल :

परंतु, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता असे संबंधित यथोचित नोंदणीकृत दस्तऐवज १५ जुलै २०१३ पूर्वी सादर करण्यात येतील.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) मधील "दाननिधी निर्मितीसाठी" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "तारण म्हणून ठेवावी लागेल." या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"अनुसूची 'ग' मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणत्याही बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल. तथापि, इरादा पत्र देण्यात येण्यापूर्वी, उक्त रक्कम ही दाननिधी निर्माण करण्यासाठीची प्रतिभूती ठेव म्हणून व्यवस्थापन आणि संबंधित जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरीत्या, राष्ट्रीय बचत

प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवण्यात येईल; असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याकडे तारण म्हणून ठेवण्यात येईल. असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव पुढील नवीकरणाच्या अटीच्या अधीनतेने, किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल :

परंतु, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, अशी रक्कम १५ जुलै २०१३ पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेव म्हणून ठेवण्यात येईल, या अटीच्या अधीन, शासनास संयुक्त ठेवीची अट शिथिल करता येईल.''.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये,— सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ६ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मध्ये, ''३१ ऑक्टोबर'' या मजकुराऐवजी ''३० सप्टेंबर'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, ''हरकती व सूचना कोणत्याही असल्यास, त्यासह'' या मजकुरानंतर ''शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) याच्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह'' हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७ ची सुधारणा.

''परंतु, शासनास, यथायोग्य पडताळणी केल्यानंतर व त्याबाबतची कारणे नोंदवून, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षासह अशा कोणत्याही निर्णयाचे पुनर्विलोकन करता येईल.''.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, ''त्या शैक्षणिक वर्षाच्या १ मे'' या मजकुराऐवजी ''कलम ३ मध्ये निर्देशिलेल्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर'' हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ८ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या अनुसूची 'क' मध्ये,— सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची 'क' ची सुधारणा.

(१) नोंद (२) मधील, ''पूर्व-प्राथमिक किंवा'' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) नोंद (५) मधील, ''प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक'' या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

''प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक'';

(३) नोंद (११) मध्ये,—

(क) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (क) नोंदणीकृत न्यासाच्या किंवा नोंदणीकृत संस्थेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नावे असलेली जमीन : " ;

(ख) खंड (ग) वगळण्यात येईल ;

(४) नोंद (१२) मधील, खंड (ख) व (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ख) शहरी व ग्रामीण भागात एक एकर : " .

९. मुख्य अधिनियमाच्या अनुसूची 'ग' मध्ये, नोंद (क) मधील, ''किंवा प्राथमिक शाळेला संलग्न असलेली पूर्व-प्राथमिक'' हा मजकूर वगळण्यात येईल. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची 'ग' ची सुधारणा.

सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**१०.** (१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१३ चा महा. अध्या. १२.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ३४] बुधवार, ऑगस्ट २१, २०१३/श्रावण ३०, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १८.००

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) (Second Amendment) Act, 2013 (Mah. Act No. XIX of 2013), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 2013.

(*First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 21st August 2013.*)

An Act further to amend the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) (Second Amendment) Ordinance, 2013, on the 2nd July 2013;

Mah. I of 2013. Mah. Ord. XII of 2013.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Sixty-fourth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) (Second Amendment) Act, 2013.

(2) It shall be deemed to have come into force on the 2nd July 2013.

Amendment of section 2 of Mah. I of 2013.

2. In section 2 of the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (hereinafter referred to as " the principal Act "), in sub-section (1),— Mah. I of 2013.

(1) clause (f) shall be deleted ;

(2) in clause (l), the words " pre-primary school, " shall be deleted.

Amendment of section 3 of Mah. I of 2013.

3. In section 3 of the principal Act,—

(1) existing section 3 shall be re-numbered as sub-section (1) thereof ;

(2) the words " pre-primary or " shall be deleted ;

(3) for the figures, letters and word " 30th June " the figures, letters and word " 31st July " shall be substituted ;

(4) after the proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided further that, for the academic year 2014-2015, such application shall be made before the 8th August 2013.";

(5) after sub-section (1) as so re-numbered, the following sub-sections shall be added, namely :—

" (2) The Government may prescribe detailed procedure for processing the applications received under sub-section (1) including procedure for declaration of eligibility, issuing of Letter of Intent and Letter of Approval.

(3) If, in the Development Plan, the Competent Authority has reserved the plot for education purposes having area less than the area specified in entry (12) of Schedule A, in such case, the Government may relax the condition regarding area of land specified in entry (12) :

Provided that, for the academic year 2013-2014, such relaxation may be made with retrospective effect.

(4) The condition regarding area of land specified in entry (12) of Schedule A, shall not be applicable for the proposals of up-gradation of schools having complied with the norms and standards required under the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009. 35 of 2009.

(5) If, any registered trust or a registered society or a local authority has submitted the application for establishing a new school under sub-section (1) and complied with all conditions, except the requirement of registered documents specified in entry (11) of Schedule A, in such case, the Government may grant permission to establish a new school applied for, if such trust or society or local authority has submitted the duly registered documents before issuing the Letter of Intent :

Provided that, for the academic year 2013-2014, such duly registered documents shall be submitted before the 15th July 2013.".

4. In section 4 of the principal Act, in sub-section (*1*), for the portion beginning with the words " specified in Schedule C " and ending with the words "District Education Officer." , the following shall be substituted, namely :— Amendment of section 4 of Mah. I of 2013.

" specified in Schedule C as fixed deposit in any Bank. However, before issuing the Letter of Intent, the said amount shall be deposited jointly in the name of the management and the concerned District Education Officer (Secondary) by way of National Saving Certificate or Fixed Deposit in any Nationalized Bank as security deposit towards creating an endowment fund ; and pledge, such Certificate or Fixed Deposit with the concerned District Education Officer. Such Certificate or Deposit shall be made for a period of minimum three years subject to the condition of further renewal :

Provided that, for the academic year 2013-2014, the Government may relax the condition of deposit in the joint name however, subject to the condition that such amount shall be deposited in the Nationalized Bank before the 15th July 2013.".

5. In section 6 of the principal Act,— Amendment of section 6 of Mah. I of 2013.

(*1*) in sub-section (*1*), for the figures, letters and word " 31st October " the figures, letters and word "30th September" shall be substituted ;

(*2*) in sub-section (*2*), after the words " if any, received " the words and brackets " along with self-explanatory recommendation of the Director of Education (Secondary and Higher Secondary) " shall be added.

6. In section 7 of the principal Act, in sub-section (*2*), the following proviso shall be added, namely :— Amendment of section 7 of Mah. I of 2013.

" Provided that, the State Government may, after due verification and recording reasons, review any such decision including for the academic year 2013-2014.".

7. In section 8 of the principal Act, in sub-section (*1*), for the figure, letters and words " 1st May of the academic year " the figures, letters and words " 30th November of the year referred to in section 3 " shall be substituted. Amendment of section 8 of Mah. I of 2013.

8. In Schedule A of the principal Act,— Amendment of Schedule A of Mah. I of 2013.

(*1*) in entry (2), the words " Pre-primary or " shall be deleted ;

(*2*) in entry (5), for the words " Primary or Upper-primary or Secondary or Higher Secondary", the following shall be substituted, namely :—

" Primary to Upper Primary or Upper Primary to Secondary or Secondary to Higher Secondary " ;

(*3*) in entry (11),—

(*a*) for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

" (*a*) Land in the name of registered trust or registered society or local authority:" ;

(*b*) clause (*c*) shall be deleted ;

(*4*) in entry (12), for clauses (*b*) and (*c*), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) One acre in city and rural area :".

(२) शालेय शिक्षण



Amendment of Schedule C of Mah. I of 2013.

**9.** In Schedule C of the principal Act, in entry (*a*), the words " or pre-primary attached to primary " shall be deleted.

Repeal of Mah. Ord. XII of 2013 and saving.

**10.** (*1*) The Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) (Second Amendment) Ordinance, 2013, is hereby repealed. Mah. Ord. XII of 2013.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or, as the case may be, issued under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.